**प्रतिबिंब २०१९ स्नेहसंमेलन व विद्यार्थी गौरव समारंभ**

आजच्या जगात पैश्यापेक्षा श्रेष्ठ ज्ञान तुम्ही घेत आहात ,पैसा तुम्हाला सांभाळावा लागेल तर ज्ञान तुम्हाला सांभाळेल तेव्हा ज्ञान हा ठेवा घेण्यासाठी सतत प्रयत्न करा आणि तुमच्या व्यक्तीमत्वात चार गुण असावेत तुमची “वाणी”जे तुम्ही बोलता ते स्वच्छ आणि नम्र असावे ,”विचार”जे तुम्हाला कृतीतून व्यक्त होताना सन्मान देतील,”वर्तन” असे असावे जे तुमच्या चांगल्या कर्तुत्वाचे गुणगान करेल आणि “लेखणी”जी तुमच्या विचाराना अधिक सशक्त करेल असे केसीईच्या शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजीत प्रतिबिंब २०१९ स्नेहसंमेलन व विद्यार्थी गौरव समारंभात केसीईचे सांस्कृतिकविभाग समन्वयक व प्रशासकीय अधिकारी शशिकांत वडोदकर यांनी विचार मांडले.यावेळी मंचावर प्राचार्य डॉ.अशोक राणे, डीएड विभागप्रमुख डी.डी. भाटेवाल,प्रा.निलेश जोशी,प्रा.रंजना सोनवणे,डॉ.स्वाती चव्हाण,प्रा.अंजली बन्नापुरे ,प्रा.हेमलता चौधरी उपस्थित होत्या.






यावेळी पुढे बोलताना त्यांनी जगणे किती आशावादी असावे याबद्दल डॉ.अभय बंग व राणी बंग यांच्या कामाचे उदाहरण देऊन समजावले. प्राचार्य डॉ.अशोक राणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करत असताना काम करताना ते अधिक उत्कृष्ट कसे होईल आणि त्याची व्याप्ती कशी वाढेल याबद्दल आपण सतत प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रंजना सोनवणे यांनी केले तर सुत्रसंचालन खगेश्वरी पाटील व लीना पाटील यांनी केले. आभार डॉ. स्वाती चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम उदघाटनानंतर विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाला सुरवात झाली यात विद्यार्थ्यांनी आपले विविध नृत्य,गीते,डान्स सादर केले यासोबत शेला पांगोटे यात विविध गीत वाजवून त्या विद्यार्थ्यांना सादरीकरण करावे लागले.कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व विध्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.